# गर्भातच मराठी शाळा मारण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या कृत्याविषयी

आम्ही महाराष्ट्राचे रहिवासी आहोत. मराठी ही आमची पहिली भाषा आहे. मराठी ही आमची परस्पर संवादाची कायमची भाषा आहे; ती आमची शिकण्याची विचार करण्याची, कल्पना करण्याची भाषा आहे. मराठी ही आमची भावना व्यक्त करण्याची आणि एकूण अभिव्यक्तीची भाषा आहे. मराठी भाषा ही आमच्या व्यावहारिक जीवनाचा आधार आहे. मराठी भाषा हा आमच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

कित्येक वर्षांपूर्वी मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा म्हणून घोषित झाली. सर्व शासकीय व्यवहारांची ती अधिकृत भाषा म्हणून गणली गेली. मराठी भाषेच्या वृध्दीसाठी आणि समृध्दीसाठी सतत प्रयत्नशील राहणे हे महाराष्ट्र शासनाचे आद्य कर्तव्य ठरले. मराठी भाषेच्या विकासाचे निश्चित स्वरूपाचे व दीर्घकालीन धोरण असायला हवे आणि ते धोरण सातत्याने राबविण्याची नोकरशाहीची भूमिका व बांधिलकी असायला हवी. शासनाच्या कोणत्याही विभागाच्या, कोणत्याही निर्णयांमध्ये मराठी भाषेच्या विकासाची दिशा अंगभूत असायला हवी.

मराठी भाषेतून शिकणे हा मराठी माणसाचा मूलभूत हक्क आहे. मराठी माध्यमाच्या शाळा काढणे आणि त्या चालविणे हा आम्हाला घटनेने दिलेला हक्क आहे. मराठी शाळा टिकविणे नि त्यांचा दर्जात्मक विकास करीत राहणे हे, समाजाइतकेच शासनाचेही महत्त्वाचे नि अंगीकृत असे कार्य आहे. जेव्हा सरकारी शिक्षणखाते या त्यांच्या कर्तव्यात कसूर करते तेव्हा त्यांना वठणीवर आणणे हे मराठी माणसाचे, जागरूक माणसाचे कर्तव्य आहे.

महाराष्ट्र शासन हे मराठी माध्यमातील शिक्षणाबाबत कायमच कद्रू वृत्ती धारण करीत आले आहे. २००८ सालापासून तर, मराठी माध्यमाच्या शाळांना मान्यता न देण्याचेच सरकारचे अधिकृत धोरण होते. पुढे १९ जून २०१० च्या परिपत्रकाने, महाराष्ट्रात नव्याने मराठी शाळा काढणे व चालू ठेवणे हा गुन्हा ठरवून शासनाने, दंडाची, फौजदारी खटला करून तुरूंगात टाकण्याची कारवाई करण्यापर्यंत आपल्या मराठी द्वेषाची मजल मारली होती.

अशावेळी जागरूक मराठी शाळांच्या संस्थाचालकांनी ' शिक्षण हक्क समन्वय समिती' स्थापन करून शासनाच्या ह्या अन्यायाविरूध्द संघर्ष उभा केला. उपोषण, सत्याग्रह व अन्य शांततापूर्ण मार्गाने शासनाला आपले मराठी शाळांच्या विरोधातील पत्रक मागे घ्यायला लावले. संघर्षाची परिणती — स्वयंअर्थसहाय्यित शाळांचा कायदा' होण्यात झाली. शिक्षण हक्क समितीच्या शाळांना या कायद्यान्वये ' विवक्षित 'शाळा म्हणून सर्व सवलतींनिशी मान्यता प्रदान करण्यात आली. शासनाने आपले विहीत कार्य बजावले.परंतु,अजूनही, अनेक मराठी शाळांना मान्यता मिळूनही त्यांना साधे — प्रथम मान्यतेचे पत्र देण्यास शिक्षणखात्यांचे अधिकारी टाळाटाळ करताहेत. मराठी शाळांना त्रास देण्याचे आपले स्वतःचे धोरण राबवताहेत.

नवीन ' स्वयंअर्थसहाय्यित शाळां ' च्या कायद्यान्वये, विवक्षित शाळांना विधानसभेच्या स्तरावरून कायद्यातील ___ कठीण अटींतून मुक्तता मिळूनही ही गोष्ट अमान्य करून, मराठी शाळांची मान्यता अडकावून ठेवताहेत.

' स्वयंअर्थसहाय्यित शाळां' च्या कायद्यान्वये कुणालाही शाळा काढण्याचा प्रस्ताव दाखल करता येत असताना,शिक्षणखाते, जाहिरात प्रसृत करून, शाळांचे प्रस्ताव मागवीत आहेत; व असे करतानाही फक्त ' इंग्रजी ' शाळांसाठीचे प्रस्ताव मागवून दाखल करून त्यांनाच फक्त मान्यता प्रदान करीत आहे. मराठी शाळांचे प्रस्ताव न स्वीकारण्यामागे मराठी माध्यमाच्या शाळांना गर्भातच मारून टाकण्याचे महत्पाप शासन करीत आहे. शासन पुन्हा एकदा, मराठी शाळांना मारण्याचे, २००८ सालचे आपले धोरण, पुन्हा, या कायद्याच्या उफराटा अर्थ लावून, मागील दाराने आणत आहे. या शिक्षणखात्याच्या कृत्याचा जाब आपण शासनाला विचारू या.

मराठी शाळा मारण्याच्या शिक्षणखात्याच्या सर्व कृतींचा आम्ही निषेध करीत आहोत !

आम्हाला, महाराष्ट्रात, मराठी शाळा काढण्याचा व चालविण्याचा हक्क आहे, शासनाने याच्या विरोधात पावले टाकत कामा नयेत, हे आम्ही महाराष्ट्र सरकारला बजावून सांगू इच्छितो !

❖